साथी अजित सरदार

March 1993

संपादकीय–३ "The alternative of Maulana Vahiduddin and Sharad Patil on the Ayodhya issue"

# अयोध्याप्रश्नी मौलाना वहिदुद्दीन यांचा पर्याय व शरद् पाटलांचा पर्याय

मुख्यत: बाबरी मशिदीच्या संरक्षणाचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून राव सरकारने जरी सर्व भाजपेतर पक्षांच्या पाठिंब्याने 'प्लेसेस ऑफ वर्शिप ॲक्ट,' १९९१, हा कायदा पास केला, तरी ती ६।१२।९२ ता. ला पाडली गेली व मशीद त्याच जागी पुन्हा बांधली जावू नये म्हणून लगेच त्या जागेवर रामलल्लाचे पूजास्थान उभारण्यात आले. हाय कोर्टाने रामलल्लाच्या पूजेला परवानगी देऊन या पूजास्थानावर कायदेशीर शिक्कामोर्तब केले आहे. जरी सुप्रीम कोर्टाने बाबरी मशिदीच्या जागी राममंदीर होते असा निर्णय दिला– जे आर्केऑलॉजीची अनिश्चितता पाहाता मुष्किल आहे– तरी भाजप व संघपरिवार यांनी वारंवार सांगितले आहे की धार्मिक श्रद्धेच्या प्रश्नावर ते न्यायालयाच्या कोणत्याही निकालांना जुमानणार नाहीत. म्हणून, केंद्र सरकारने जरी मशिदीच्या पुनर्बांधणीचा निर्णय घेतला –जे असंभाव्य आहे-तरी भाजप व संघपरिवार यावरही धर्मांधता भडकवील. मुंबई व कलकत्त्यातील बॉम्बस्फोट आणि संभाव्य बॉम्बस्फोट यांचाही उपयोग मुसलमानद्वेषाच्या मोहिमेसाठी केला जात आहे मध्य प्रदेश, राजस्थान, हिमाचल प्रदेश व उत्तर प्रदेश या राज्यांत होणाऱ्या विधानसभा निवडणूका भाजप हमखास जिंकेल आणि मग तो लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीची मागणी करील. तीत तो सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून येईल आणि एआयडीएमके सारख्या पक्ष व संघटनांच्या मदतीने सरकार बनवील. मग भाजप बाबरी मशिदीच्या जागेवर राममंदिर बांधील आणि काशी व मथुरेच्या मशिदी पाडून त्याजागी अनुक्रमे विश्वेश्वर व कृष्ण यांची मंदिरे बांधील.

भाजप व संघपरिवाराला रोखायचे असेल, तर त्यांना अयोध्येतच रोखता येईल. वादग्रस्त नसलेल्या काशी व मथुरेचे प्रश्न पेटवण्यात एकदा का ते यशस्वी झाले, की त्यांना रोखणे अशक्यप्राय होईल. भाजपेतर कोणत्याही पक्षाला वा आघाडीला देशापुढे असलेल्या भीषण धोक्याची जाणीव नाही. म्हणून यांपैकी कोणत्याही पक्षाने वा आघाडीने धार्मिकवादाची ही चढाई अयोध्येत रोखायचा प्रस्ताव मांडलेला नाही.

अयोध्येचा प्रश्न सोडवण्यासाठी दोनच पर्याय पुढे आलेले आहेत. एक मौलाना वहिदुद्दीन यांचा व दुसरा शरद् पाटलांचा. आपण प्रथम पहिला पर्याय विचारात घेऊ या.

## मौलानांचा पर्याय

मौलाना वहीदुद्दीन यांनी तीन कलमी पर्याय मांडलेला असून त्याचा ते देश-भर प्रचार करीत आहेत-

१) मुसलमानांनी बाबरी मशीदीची जागा सोडून द्यावी.

२) मोबदल्यात हिंदूंनी देशातील कोणत्याही मुसलमान पुजास्थानावर हक्क सांगू नये.

३) पुजास्थानांना 'प्लेसेस ऑफ वर्शिप अॅक्ट, १९९१' चे घटनात्मक संर-क्षण द्यावे.

(इंडियन एक्सप्रेस, २०-३-९३)

## शरद् पाटलांचे या पर्यायावर भाष्य

प्रथम म्हणजे, हा वाद हिंदू व मुसलमान या दोन जमातींमधला आहे असे म्हणणे म्हणजे या दोन जमातींचे एकमेव प्रतिनिधी त्यांचे मूलतत्त्ववादी आहेत असे कबूल करणे आहे. यातून यापेक्षाही जास्त स्फोटक प्रश्नांवर देश त्यांच्या दावणीला बांधलेला राहील आणि धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी व डाव्या शक्तींनी कोणताही विधायक हस्तक्षेप करणे कायमचे निकालात निघेल.

दुसरे म्हणजे, मौलाना ज्या शक्तिस्थानावरून देवघेव करू पहात आहेत ते अस्तित्वात राहिलेले नाही. मशीद अस्तित्वात नाही आणि तिचे स्थान केवळ वाद-ग्रस्तच नाही तर ते सरकारने ताब्यात घेतले आहे, आणि रामलल्ला पूजास्थान प्रत्यक्षात भाजप व संघपरिवाराच्या ताब्यात आहे. रामभक्त रामलल्लाच्या उपासनेला जाऊ शकतात, पण मुसलमानमात्र बाबरीस्थानावर नमाज पढायला जाऊ शकत नाहीत. मग, मशीदस्थान प्रत्यक्षात भाजप व संघपरिवाराच्या ताब्यात असता त्यांनी काशी, मथुरा व इतर मशीदींबाबत आश्वासन कशासाठी द्यावे? आणि समजा, भाजप व संघपरिवाराने मौलानांचा पर्याय जरी स्वीकारला, तरी बाबरीस्थानावर राममंदिराचा पाया बांधताच ते करार मोडतील!

आणि मौलानांनी, व एकूणच भारतीय मुसलमानांनी, अरब व तुर्क साम्राज्य-वाद्यांनी केलेल्या मंदिरभजनांबद्दल बचावाबर जायचे काय कारण आहे? इराणी

साम्राज्यवाद्यांबद्दल महान कवी शेख सादी म्हणाला होता–

'इराणचे सम्राट,
ज्यांनी निम्नवर्गीयांना पीडले :
गेले त्यांचे वैभव व साम्राज्य;
गेला त्यांचा शेतकऱ्यांवरचा जुलूम.'

अरब व तुर्क साम्राज्यवाद्यांच्या कृत्यांबद्दल भारतीय मुसलमानांना जबाबदार धरायचे असेल, तर हल्लीच्या भाजप-संघपरिवारासारख्या ब्राह्मणी शक्तींना त्यांच्या आर्य पूर्वजांनी आणि पुष्यमित्र व शशांकसारख्या ब्राह्मणी राजांनी अनार्य व बौद्धांच्या केलेल्या कत्तलीं व वास्तुविनाशाबद्दल जबाबदार धरायला पाहिजे (तपशीलासाठी पहा 'धर्मनिरपेक्षता: ब्राह्मणी व अब्राह्मणी' हा कॉ. शरद् पाटील यांचा याच अंकातील लेख, पा.६).शशांक राजाने इसवीच्या ६ व्या शतकात ब्राह्मणीकरण केलेल्या बोधगयेच्या बुद्ध-मंदिराला सोडायला व ते बौद्धांच्या व दलितांच्या हवाली करायला विश्व हिंदू परिषद अजून तयार नाही.

## शरद् पाटलांचा पर्याय

शरद् पाटलांनी सुचवलेला पर्याय या पार्श्वभूमीत पाहिला पाहिजे–

' अयोध्या विवाद सोडवायचा खालील पर्याय दोन्ही बाजूंना सन्माननीय आहे. जर त्यांनी या पर्यायाला मान्यता दिली, तर राममंदिराची बांधणी व बाबरी मशिदीची पुनर्बांधणी लगेच सुरू होऊ शकते आणि तीही स्नेहभावात.

१) रामलल्लाच्या जागी राममंदिर व बाबरी मशीद यांच्यात बफर म्हणून लोककुल बांधावे. लोककुल हे देवकुलचे आधुनिक नामकरण आहे. भासाच्या (इसवीपूर्व ५००) ' प्रतिमानाटक ' या संस्कृत नाटकात आपल्याला देवकुल आढळते. देव म्हणजे राजा व कुल म्हणजे वंश. देवकुलात राजवंशाच्या मृत राजांचे पुतळे उभारले जात. या पुतळ्यांची पूजा करायला मनाई होती. ते आर्ट गॅलरीसारखे होते आणि म्हणून धर्मनिरपेक्ष. प्रस्तावित लोककुलात आजच्या भारतीय जनतेच्या (लोक) अशा प्रातिनिधिक पूर्वजांचे (कुल) पुतळे उभारले जावेत की जे रामाच्या स्त्रीराज्यविरोधी, स्त्रीविरोधी व शूद्रविरोधी चातुर्वर्ण्यप्रस्थापनेच्या मोहिमेचे बळी होते. ते होते मलद–करूषांची राणी ताटका जिचा रामाने चातुर्वर्ण्यप्रस्थापनेसाठी वध केला, रामाची महिषी सीता जिचा रामाने इतका छळ केला की तिला शेवटी आत्महत्या करावी लागली, आणि शूद्र शंबूक ज्याचा रामाने वर्णधर्मोल्लंघनाबद्दल

शिरच्छेद केला (त्याला तपश्चर्या करून सदेह स्वर्गाला जायचे हे वरवरची कारण होते, खरे कारण त्याने शूद्राचे उत्पादक वर्णकर्म सोडले हे होते.) ताटका ही आजच्या आदिवासींची पूर्वजा आहे, सीता ही भारतीय स्त्रीजातीची पूर्वजा आहे आणि शंबूक हा आजच्या दलित व ओबीसींचा पूर्वज आहे.

२) तज्ञ वास्तुशास्त्रज्ञ व पुराणवस्तुसंशोधकांच्या समितीने या लोककुलाचा प्लॅन तयार करावा. शिल्पकारांकडून ताटका, सीता व शंबूक यांचे वले मॉडेल्स मागवून त्यातले सर्वोत्कृष्ट तज्ज्ञ समितीने निवडावेत. हे पुतळे असलेले लोककुलाचे पारदर्शक मॉडेल तयार करून त्याच्या अनेक प्रतिकृती काढाव्यात.

३) आदिवासी, स्त्रीया, दलित व ओबीसी यांच्यातल्या कारसेवकांचे प्रवाह देशाच्या सर्व दिशांकडून अयोध्येकडे यावेत. त्यांच्याबरोबर असलेल्या लेखक व कला-कलावतांनी वाटचालीत व्याख्याने द्यावीत, गाणी म्हणावीत, पथनाट्ये व नाटके, इ. सादर करावीत. प्रत्येक प्रवाहाने लोकांना दाखवण्यासाठी लोककुलाचे मॉडेल बरोबर ठेवावे.

४) केंद्र सरकारने या विवादातील दोन्ही बाजूंना आणि सर्व धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी व डाव्या पक्ष व संघटनांच्या प्रतिनिधींना बोलवून त्यांच्या समोर हा पर्याय ठेवावा. सर्व चर्चा टीव्हीवरून देशभर प्रक्षेपित करावी. कारसेवकांना अयोध्येला पोहोचून लोककुलबांधणी सुरू करता यावी यासाठी मैतक्य घडवून आणा-यचा प्रयत्न केला जावा.

हा पर्याय भाजप व संघपरिवाराच्या मर्जीवर अवलंबून राहात नाही. त्याची मदार भारतीय जनतेच्या अब्राह्मणी प्रबोधनावर व संघटनेवर आहे. कारसेवा ना रामभक्त करतील वा पारंपारिक मुसलमान. ती करणारी तिसरी शक्ती असेल. भाजप व संघपरिवाराने या पर्यायाला विरोध केला, तर ते आदिवासी, स्त्रिया, दलित व ओबीसी यांचे विरोधक ठरतील एवढेच नाही तर त्यांच्या 'ममतेतून समता' हा जातीव्यवस्थान्ताच्या दाव्याचा दंभस्फोट होईल. अब्राह्मणी जागरण व संघटन झालेल्या भारतीय जनतेच्या दडपणातून एकाकी पडल्यानंतरच ते या पर्यायाला पाठिंबा द्यायला मजबूर होतील. राष्ट्रीय विमोचनाच्या व आत्मसंरक्षणाच्या या प्रक्रियेत सहभागी होण्या-साठी एरवी गमावलेल्या रामलल्लाच्या जागेवर लोककुल बांधायला मुसलमान जनतेने संमती द्यावी अशी अपेक्षा आहे. तिने तिच्या मूलतत्ववाद्यांच्या आहारी जाऊ नये.

अशाप्रकारे ब्राह्मणी शक्तींना अयोध्येतच रोखले जाईल व बचावावर फेकले जाईल.

या पर्यायांवर सर्वश्रीत सर्व राष्ट्रीय पक्षांच्या व संघटनांच्या प्रतिनिधींचा परिसंवाद व्हावा यासाठी प्रयत्न चालू आहेत. शरद पाटलांच्या पर्यायावर चर्चा करून कृतीसाठी १६ वी विषमता निर्मूलन परिषद बोलवावी अशी विनंती डॉ. बाबा आढावांना करण्यात आली आहे. □